Power of Knowledge Peer Review Journal, Volume : II, Issue : III, Oct. to Dec. - 2018 ISSN 2320- 4494

# कामगार चळवळ व आव्हाने : एक चिकित्सक अभ्यास

प्रा.डॉ. काकासाहेब गंगाधर पोकळे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि.बीड.

**प्रस्ताविक :-**

विसाव्या शतकात अनेक महत्वाच्या संघटना समाजात निर्माण झाल्या. उदा. राजकीय पक्ष, राष्ट्र निर्मिती झाल्यामुळे राष्ट्रे निर्माण झाली. लोकशाहीचा गाडा चालविण्यासाठी संस्था निर्माण झाल्या व वाढल्या. पण या बरोबर, 'कामगार संघटनाचा उदय' झाला. हा एक महत्वाचा पैलु आहे हे मात्र खरे. पुढे मात्र विसाव्या शतकाच्या अस्ताबरोबरच कामगार संघटनाची शक्ती लोप पावत असलेची दिसते. महाराष्ट्राचा विचार करताना सुरुवातीला भांडवलदार उद्योजकांच्या डोक्यात मराठी भाषिक राज्यातील मुंबईमध्ये सरकारवर भांडवलदारांपेक्षा कामगार शेतकऱ्यांच्या समाजवादी विचाराचा जास्त प्रभाव राहीला अशी अटकळ होती कारण नेते कॉम्रेड डांगे, एस.एम.जोशी, आचार्य आत्रे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, अमर शेख हे समाजवादी कम्युनिस्ट विचार सरणीचे होते. नवा महाराष्ट्र समाजवादी असेल असे ते काहीसे स्वरुपात मांडत होते. यातुन पुढे संयुक्त महाराष्ट्राचा लढा उभा राहीला.

पुढे ग्रामीण भागात सहकार चळवळी जशा फोफावत गेल्या तशा कामगार चळवळीमात्र विस्तारल्या नाहीत. मात्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सन १९६० मध्ये मुंबई हे कामगार चळवळीचे केंद्र बनले. पुढे मुंबईच्या बाहेर प्रथम १९८० नंतरच्या काळात औरंगाबाद, नाशिक, कोल्हापुर, नागपुर येथे मोठे उद्योग उभारले गेले. तसेच मालेगाव, इचलकरंजी, सोलापुर, माधव नगर येथे नवी पॉवरलुम्स केंद्रे निर्माण झाली. यामुळे कापड गिरणी धंद्याचे बकालीकरण झाले. त्यातुनच कामगाराचे शोषण निर्माण करणारा वर्ग झाला. कामगार चळवळी उभ्या राहील्या पण त्या टिकल्या नाहीत. इचलकंरजीचा अपवाद वगळता १९७० ते २००० पर्यंत चळवळ टिकली. इतरत्र मात्र असे घडले नाही, हे मात्र खरे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

प्रस्तुत संशोधन लेखाची काही उद्दिष्टे निश्चीत करण्यात आली आहेत.

१. कामगार चळवळीची वास्तव भुमिका तपासणे.
२. राजकारण व समाजकारणाशी चळवळीच्या संबंधाचा अभ्यास करणे.
३. कामगार चळवळीचा प्रभाव कमी होण्याची कारणे तपासणी व आढावा घेणे.
४. खाऊज धोरण, बेरोजगारी २० व्या शतकातील यंत्रयुग याचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१. कामगाराचे हित जोपासणे हा कामगार चळवळीचा मुख्य हेतु आहे.
२. कामगार चळवळीच्या अनेक नेत्यांनी कामगारांपैकी आपली भूमिका चांगल्या प्रकारे पार पाडली आहे का ?
३ कामगार चळवळीचा राजकीय पातळीवर संघटना म्हणुन वापर करणे.
४. खाऊजा धोरण चळवळीला कसे मारक ठरले.

**संशोधन पद्धती :-**

कामगार चळवळ व आव्हाने याचा अभ्यास करताना विश्लेषणात्मक व स्पष्टीकरणात्मक पद्धतीचा वापर केला आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**कामगार चळवळीचा प्रभाव कमी होण्याची कारणे :-**

मार्क्सवादाने भौतिक साधनांचा, उत्पादन साधने व तंत्रज्ञान यांच्यात होणाऱ्या बदलामुळे माणसामाणसांतील देखील सामाजिक व राजकीय संबंध बदलतात हे सातत्याने पहावयास मिळते हे विसरता येत नाही.

१८ व्या शतकात खऱ्या अर्थाने कारखानदारीला सुरुवात झाल्यावर कामगार वर्गाचे स्थान समाजात व राजकारणात महत्वाचे ठरु लागले हे मात्र खरे. पुढे नव्या वर्गाचा शिलेदार म्हणुन कामगार शक्तींचा उदय झाला. पुढे त्यांनी ८ तासांचा दिवस, कामगाराचे पक्ष, संघटना, कामगार चळवळ निर्माण केल्या, ज्याचा कळस १९१७ साली सोव्हिएत क्रांतीमध्ये झाला होता. पुढे मालकांशिवाय जग निर्माण झाले. त्याचा कालावधी सन १९९१ पर्यंत टिकला हे विसरता येत नाही.

समाजवादाचा घोष सर्वच क्षेत्रात सुरु झाला. यातुन अंतरराष्ट्रीय श्रम संघटना स्थापन झाली. तसेच सर्व जगभर कामगार वर्गात उत्साह निर्माण झाला हे जरी खरे असले तरी त्यांच्यात संघर्ष वाढले हे विसरता येत नाही. सन १९२९-३० सालच्या भांडवलशाहीच्या सार्वत्रीक मंदीचा तडाखा बसल्यामुळे भांडवलशाहीचे धाबे दणाणले त्यातुनच लोककल्याणकारी राजवटीचा उदय झाला. हे सर्व घडले असले तरी भांडवलदाराचा आणि कामागरांचा संघर्ष चालुच होता.

दुसऱ्या महायुद्धेत्तर काळात राष्ट्रीय सभेतील पुढाऱ्यांच्या पुरस्काराने व साम्यवादाचे वर्चस्व कमी करण्याच्या दृष्टीने (इंटक) स्थापना झाली. पुढे त्याला 'हिंद मजुर सभा' संघटना समाजवादी विचार सरणीच्या लोकांनी स्थापन केली. तसेच जनसंघटपुरस्कारीत भारतीय मजुर संघ नवी कामगार संघटना अस्तित्वात आली. राजकारणापासुन अलिप्त असलेली 'युनाटेड ट्रेड युनियन काँग्रेस'अशी पण एक कामगार संघटना अस्तित्वात होती. प्रत्येक धंद्यात एकच कामगार संघटना असावी. कामगार चळवळ पक्षीय राजकारणापासुन अलिप्त ठेवावी आणि कार्यकर्ते व पुढारी संघटनेतुनच निर्माण व्हावेत अशा धोरणांचा सध्या पुरस्कार केला जात आहे. विशेषतः नियोजनात्मक अर्थ व्यवस्थेत अशा दृष्टीकोनाची अनिवार्य जरुरी आहे. भारतातील कामगार चळवळ ही वेतन, महागाई भत्ता, बोनस इत्यादी कारणांमुळे झाली. भारतात आज कामगार व मालक यांच्यातील संघर्ष सोडविण्यासाठी औद्योगिक समित्या, वेतन मंडळे, संयुक्त शासन मंडळे व सक्तीचे लवाद या यंत्रणेचा उपयोग केला जातो हे मात्र खरे.

कामगार व कारखानदार यांच्यातील संघर्ष हा सामोपचाराने व शांततेच्या मार्गाने आणि वाटाघाटीच्या सहाय्याने सुटावेत असे शासनाचे धोरण आहे. या विचारसरणीला 'गिरी दृष्टीकोन' म्हणुन प्रसिद्धी मिळालेली आहे.

**खाऊजा धोरण :-**

सन १९७० नंतर महागाई व कमी होणारे नफे हा प्रश्न ऐरणीवर आला. यातुनच बदलांना सुरुवात झाली. एकीकडे तंत्रज्ञानातील प्रगती, संगणक, टेलीकम्युनिकेशन, बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रातील क्रांती व दुसरीकडे कामगार संघटनेच्या वैचारिक सामर्थ्यावर हल्ला म्हणजे समाजवादी विचारसरणीवर एकुणच हल्ल्याला सुरुवात झाली होती. बदलत्या परिस्थितीशी न जुळवून घेण्यात पुरेशी लवचिकता दर्शवण्यात यश न मिळाल्याने समाजवादी विचारसरणीवर हल्ले चढवणे आणखीनच सोपे झाले होते. यातुन पुढे या संघर्षातुन नवीन आर्थिक धोरण, जागतिकीकरण, जागतिक व्यापार, संघटना, आर्थिक बँक, अंतरराष्ट्रीय नाणे निधी मार्फत स्ट्रक्चरल अॅडजेस्टमेंट प्रोग्रॅम म्हणजे खाजगीकरण (खाऊजा) याचा मारा सुरु झाला आणि पाहता पाहता जग बदलले !

बेरोजगारी :-

२० व्या शतकातील मोठे कारखाने व त्यात मोठय संख्येने काम करणारे कामगार हे वास्तव बदलुन आधुनिक तंत्रज्ञानाने कामगारांची हळुहळु जागा घेतली. कमी कामगारात प्रचंड उत्पादन काढणारे व नवीन पद्धतीची कारखाने निर्माण झाली. तसेच मोठ्या कारखान्याला सुटे भाग पुरविणारे छोटे कारखाने अस्तित्वात आले. त्यात काम करणारे असंघटीत कामगार तसेच स्वयंरोजगाराच्या गोंडस नावाखाली मालक-कामगार अशी दुहेरी भुमिका बजावणारे कामगार असे नवनी

स्वरुप समोर आले आणि या सर्वांचा परिणाम कामाचे तास, किमान वेतन, नौकरीची शाश्वती, कायम काम या सर्व संकल्पना मोडीत निघु लागल्या व त्यामुळे एकुणच बेरोजगारी वाढत राहिली हे मात्र विसरता येत नाही.

**१९ व २० व्या शतकातील यंत्र युग :-**

युनियनचे संघर्ष जुने जग वाचवु शकत नाही कारण फारफार तर मरण पुढे ढकलु शकतात हे मात्र जळजळीत वास्तव आहे. स्वेच्छा निवृत्ती, कामगार कपात, सक्तीची निवृत्ती, कारखाने बंद होणे हे सर्व प्रकार १९९० ते १९०५ या कालखंडात मोठया प्रमाणावर घडले. भारतातील डाव्या कामगार संघटनांनी एकुणच दिलेल्या लढयामुळे कामगार कायद्यात बदल मोठया प्रमाणावर करण्यात सरकार आणि भांडवलदारांना यश मिळाले नाही परंतु त्यांनी कामाच्या रचनेत व कारखान्याच्या स्वरुपात बदल करण्यात आले यामुळे आऊटसोर्सिंगचे प्रकार वाढले हे मात्र खरे.

यातुनच पुढे कंत्राटी शिक्षण, तासावरील प्राध्यापक, बांधा, चलवा व कमवा या योजनेखाली होणारे कामे असे प्रकार मोठया प्रमाणावर चालु राहिले यामुळे असंघटीत कामगारांचे वाढते लढे, दुसऱ्या बाजुला जुन्या कामगारांची संख्या व प्रभाव कमी होत आहे हे दिसुन येते. एकुच नव्या बदलाबरोबर जुने प्रश्न हे आहेतच. स्पर्धा, पक्षीय प्रभाव असणाऱ्या कामगार संघटना, धंदेवाईक कामगार संघटना, गुंड, माफीयांच्या ताब्यात जाणाऱ्या कंपन्या व अंतर्गत कामगार संघटनेस ९२ वर्षांचा इतिहास असुन ती जेमतेम १०% कामगारांना संघटीत करु शकलेल्या कामगार संघटनेचे वास्तव आहे व असे प्रश्न या बदल आणखी परिस्थितीत अडचणी निर्माण करीत आहेत हे मात्र खरे.

**महाराष्ट्रातील कामगार नेते व चळवळी :-**

कामगार चळवळीचा अग्नीबिंदु - मुंबईतील ऐतिहासिक संप आणि डॉक्टर दत्ता सामंत यांचा संघर्ष. 'सिंहासन' मधला कामगार पुढारी डिकास्टा एका प्रसंगात म्हणतो ..... तर नव्या मुख्यमंत्र्याला सचीवालयासमोर मी जोडयाने मारीन ! खरचं एक काळ अशा कामगार नेत्यांचा महाराष्ट्रात होता. हे जरी खरे असले तरी त्यातीलच एक काळ जॉर्ज फर्नांडीसांचा होता. डॉ. दत्ता सामंत, भारतीय क्रॉंग्रेस स्थापना १८८५ ला मुंबई येथे झाली. त्यात पहिली कामगार संघटना मुंबईत नारायण मेघाजी लोखंडे यांनी गिरणी कामगारांसाठी सुरु केली होती. यात सर्व जाती धर्माचे लोक सामील होते हे मात्र खरे. नंतर ना.म. जोशी, डांगे, मिरजकर, परुळेकर, दणदिवे पासुन ते दत्ता सामंतांपर्यंत मराठी माणसांकडे नेतृत्व राहीले हे विसरता येत नाही. १९२६ पासुन ते १९५० पर्यंत याच प्रक्रियेत मुंबईतील तसेच देशातील कामगार चळवळी होत्या.

**निष्कर्ष :-**

एकुणच वाढती विषमता, विनारोजगार जागतिक मंदी, महागाई, खाऊजा धोरण तसेच जनता रस्त्यावर येऊन सरकारी धोरणांना विरोध करीत आहे हे मात्र खरे असले तरी कामागारांच्या मागण्यांना दुर्लक्षीत करता येत नाही हे वास्तव आहे. एकुणच मोठमोठया कंपन्यांना अस्वस्थ जगण्याची प्रचती कामगार संघर्षातुन मिळत आहे.

म्हणुन १९३० नंतर ज्याप्रमाणे भांडवलशाही विरुद्ध हुकूमशाही हा संघर्ष झाला होता व त्यात इटली, जर्मनी, जपान, स्पेन सारख्या राष्ट्रांनी भांडवलशाही, हुकूमशाहीचा मार्ग अंगिकारला होता अशी परिस्थीती आज दिसत आहे.

एकुण कामगार संघटनांनी लोकशाही वृद्धींगत करुन नवीन पद्धतीचा अवलंब केला पाहिजे हे मात्र खरे व माणुसच हा आर्थिक व्यवहाराचा कणा आहे हे लक्षात घेऊन लढे लढवले पाहिजेत असे मला वाटते.

संदर्भ :-


१. Cole, G.D.H. Organised Labour, London, १९२४.
२. Galenson Walter Comparative Labour Movements New York १९५२.
३. परिवर्तनवादी चळवळी संपादक डॉ. राजशेखर सोलापुरे
४. महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय विकास - प्रा. एस.के. पाटील २६ जानेवारी २०१४
५. महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष - डॉ. विठ्ठल मोरे

2018 -19

122


| RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | | ISSN- 2348-7143 |
| --- | --- | --- |
| Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676<br>Special Issue 92 , महात्मा गांधी यांचे विचार | January 2019 | UGC Approved<br>No. 40705 |


# महात्मा गांधीजीचे सत्याग्रहासंबधीचे विचार


**डॉ.श्री.काकासाहेब गंगाधर पोकळे**

*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि.बीड*


---

**प्रस्तावना :-**

भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी अनेक देशभक्तांनी आपल्या जीवाची पर्वा न करता कार्य केले. अनेक देशभक्त तुरुंगात गेले. सुखदेव,
राजगुरु, भगतसिंग फासावर गेले. त्यांना इंग्रज सरकारने फाशी दिली. अशा देश भक्ता पैकी एक देशभक्त म्हणजे राष्ट्रपिता म.गांधी आहेत.
म. गांधीचे पुर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. राजकीस परिवर्तनाच्या बाबतीत महात्मा गांधीचे विचार देखील मुलगामी स्वरुपाचे आहेत.

म. गांधीजींचे अंतिम ध्येय वर्गरहीत, शोषणरहीत समात निर्माण करणे हाच होता. म. गांधीजी स्वतःला अराज्यवादी मानीत होते. मात्र
अराज्यवादाच्या स्थितीपर्यंत समाज परिवर्तनाचा त्यांचा मार्ग युरोपीय अराज्यवादी पेक्षा पुर्णतः वेगळा होता. म. गांधीना रामराज्य सर्वश्रेष्ठ
वाटत होते. म. गांधीच्या मते या राज्यात व्यक्ती पुर्णपणे स्वतंत्र असेल. गांधीजींच्या रामराज्यातील व्यक्ती अहंकारी व आक्रमक राहणार
नाही. व्यक्ती इतरांचा अधिक विचार कराणारा असेल. गाव पुर्णपणे स्वतंत्र असेल. राज्यशासनांची जागा तेथे स्वयशासनाने घेतलेली असेल.
नितीमत्तेला तेथे् प्राधान्य असेल. गांधीजींना परीवर्तण हवे होते परंतु परिवर्तण हे पुर्णपणे अहिंसेच्या मार्गाने असायला हवे. म. गांधीना क्रांती
नको होती त्यांना सुधारणा हवी होती. क्रांतीमधुन एक शासन जाऊन दुसरे शासन येईल, येणारे शासन हे हिंसेवर अवलंबुन असेल म्हणुन हे
शासन जुलुम करणारेच असेल. हिंसेतुन हिंसाच जन्म घेते. हिंसेतुन शांतीचे अपेक्षा करणे चुकीचे आहे. अहिंसा या मार्गामुळे अन्यायाला
प्रतिकार करण्याचे राहुन जाते. गांधी अहिंसेच्या मार्गास प्राधान्य देतात. कायमस्वरुपी परिवर्तनासाठी असे म. गांधीचे प्रतिपादन आहे.

**म. गांधीजींचा परीचय -**

म. गांधीजीचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 या दिवशी गुजरातमधील पोरबंदर या गावी झाला. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थीती
चांगल्या प्रकारची होती. त्यांचे कुटुंब धार्मीक स्वरुपाचे होते. 1887 साली गांधीजी मॅट्रीक पास झाले. त्यांच्या घरची आर्थीक परिस्थीती
चांगली असल्यामुळे ते उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लडला गेले. आणि वयाच्या 22 व्या वर्षी बॅरीस्टर पदवी घेऊन भारतात आले. भारतात
परत आल्यानंतर राजकोट येथे वकीली सुरु केली. परंतु त्यांची वकीली राजकोट येथे फारशी चालली नाही. त्यांच्या कुटुंबाने म. गांधीना
नैतीकता चांगल्या प्रकारे शिकवली होती. त्यांचे कुटुंब धार्मीक असल्यामुळे त्यांच्या आईने गांधीजी इंग्लडला शिक्षणासाठी जात असताना
काही नितीमुल्य सांगीतले होते त्यांच्या आईने त्यांच्याकडुन वचन घेतले होते की इंग्लडला गेल्यावर गांधी मद्य, मांस, आणि परस्त्री यापासुन
अलिप्त राहतील. म्हणजेच त्यांना नितीमत्तेचे शिक्षण त्यांच्या आईने त्यांना बालपनी दिले होते. यावरुन दिसुन येते गुजरात मधील अनेक
व्यावसायीक त्या काळी दक्षिण आफ्रीकेत स्थायीक झाले होते. त्यांच्यापैकी एकाचा दावा चालवण्यासाठी वकील या नात्याने ते 1893 मध्ये
दक्षिण आफ्रीकेल गेले. हि घटना गांधीजीच्या दृष्टीने ऐतीहासीक ठरली. दक्षिण आफ्रीकेत काळे ( निग्रो) लोकसंख्येने अधिक होते. काही
भारतीय होते. तर गोरे लोक अगदी थोडे होते. परंतु सरकार फक्त गोरे लोकच चालवत होते. हे अगदी थोडे गोरे लोक काळ्या वर्णाच्या
लोकांना तुच्छतेने वागवत व त्यांच्यावर अन्याय अत्याचार करीत असत. द. आफ्रीकेत भारतीय नागरीकांवर होणाऱ्या अन्याया विरुध्द बंड
पुकारले आणि चळवळ सुरु केली. सत्याग्रह सुरु केला, भारतीयांचे नेतृत्व केले. त्यांच्यावर होत असलेला अन्याय दुर करण्यासाठी म.
गांधीनी द. आफ्रीकेत नाताळ इंडीयत कॉंग्रेस स्थपण केली. तरुणपणाचा 20 वर्ष काळ दक्षिण आफ्रीकेत घालवीला.

महात्मा गांधीना व्यक्तीमध्ये परिवर्तन हवे होते. व्यक्तीचे परीवर्तन हे ऱ्हदयापासुन व्हावे असे म. गांधीजीचे म्हणने होते. गांधीजीच्या
संघर्ष टाळताना कसलीच हिंसा झाली नाही पाहीजे, सामाजीक, राजकीय, अन्यायाचे निराकरण करण्यासाठी कृतीचा नाही सामुदायीक
सत्यागृहाचा मार्ग योग्य आहे. हा मार्ग सत्याचा आग्रह धरणारा असल्यामुळे निश्चीत सकारात्मक परिवर्तणाकडे नेणारा आहे असे मत
गांधीजींचे होते.

**म. गांधीजीवर पडलेला प्रभाव :-**

म. गांधीजींचे कुटुंब धार्मीक होते. कुटुंब धार्मीक असल्यामुळे त्यांच्या घरी गीता, रामायण, महाभारत असे अनेक ग्रंथ होते. म.
गांधीवर चांगले संस्कार झाल्यामुळे आपोआपच गीता या ग्रंथाचा अभ्यास म. गांधीनी केला आणि गीतेचा सर्वात जास्त प्रभाव गांधीजीवर
पडला होता. गांधीजीवर त्यांच्या आई वडीलांचे संस्कार झाल्यामुळे ते परदेशात राहीले तरी त्यांनी पाश्चिमात्यांचे अनेरण केले नाही. अहिंसेचे
तत्व त्याना बायबल मधुन मिळाले होते. गोपाळ कृष्ण गोखले यांना म. गांधीनी गुरु मानले होते. शांतता पुर्ण जिवण आणि सदनशिर मार्ग हि
शिकवन गोखल्यांनी म. गांधीला दिली होती. रस्कीन या विचारवंताच्या ग्रंथाचा अभ्यास अंत्योदय व सुर्योदय या विचाराची प्रेरणा घेतली
होती. गांधीजी म्हणतात की रस्कीन च्या ग्रंथाने माझ्या जीवनाला कलाटनी दिली. टॉलस्टायच्या द गॉड इज विदीन यु या ग्रंथातुनच आत्म्याचा
आवाजासंबधी आपली भुमीका मांडली त्यामुळेच ते म्हणत माझ्या आत्म्याचा आवाज मला येतो व मी तसाच वागतो. त्या काळातील
परिस्थीतीचा प्रभाव गांधीजीवर पडला होता.

**म. गांधीजींचे राजकीय विचार :-**

म. गांधीजींनी आपले विचार व्यक्त करताना क्रमबध्दता न करता परिस्थितीनुरुप मांडले. त्यानी त्यांच्या विचारातुन कोणत्याच वादाला
जन्म दिला नाही. गांधीवाद म्हणुन कोणताही सिध्दांत मांडला नाही. गांधीवाद हा कोणताही एक सिध्दांत नसुन तो जीवन जगण्याचा दृष्टीकोन
व शैली आहे. महात्मा गांधीनी त्यांचे पाच (5) राजकीय मांडले आहेत ते पुढील प्रमाणे.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , महात्मा गांधी यांचे विचार

1. सत्य आणि अहिंसा
2. सत्यगृह
3. राज्य
4. धर्म
5. गांधीवाद व साम्यवाद

तर आपण इथे सत्याग्रह विषयीचे गांधीजींचे विचारांचा अभ्यास करु.

**म. गांधीचे सत्यागृहासंबधी विचार :-**

सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह धरणे. सत्याग्रह म्हणजे आपल्या सत्य मागण्या मान्य करुण घेण्यासाठी कसलीही हिंसा न करता केलेले आंदोलन म्हणजे सत्याग्रह होय. गांधीचे नाव उच्चारले की आपणाला सत्यग्रहाची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. सत्यागृहामुळे कसलेच शस्त्र हातात न घेता जनता जुलमी कायद्याचा कसा प्रतिकार करु शकते हे गांधीजींनी सत्याग्रहाच्या रुपाने दाखपुन दिले आहे. अशा सत्याग्रहाचा वापर जागतीक पातळीवर होऊ शकतो. सत्याग्रह हे तंत्र भारतापुरते मर्यादीत नाही. नेल्सन मंडेलांनी सत्याग्रहाचा वापर करुनच दक्षिण आफ्रीकेत स्वातंत्र मिळवले. सत्याग्रह म्हणजे सत्यचा आग्रह धरणे, स्वतःला त्रास झाला तरी आनंदाने सहन करणे, प्रती पक्षाला त्रास न देणे, प्रतिपक्षाविरुध्द शस्त्राचा वापर न करणे, स्वतः आत्मक्लेश सहन करावयाचा पण अन्याय करणाराचे मन वळवायचे अन्याय थांबवायचा आपली बाजु सत्याची न्यायाची आहे हे सिध्द करायचे, प्राणाची बाजी लावुन सत्याचे रक्षण करणे म्हणजे सत्याग्रह होय.

**सत्याग्रहाची साधणे :-**

1. असहकार, 2. सविनय कायदेभंग, 3. हरताळ (संप), 4. उपोषण, 5. बहिष्कार, 6. हिजरत किंवा देशत्याग, 7. धरणे.

**1. असहकार :-**

असहकाराबाबत म. गांधीनी पुढीलप्रमाणे लिखाण केले आहे.

अत्याचार आणि शोषण म्हणजे शोर्षीतांच्या इच्छित किवा अनिश्चित सहकार्याचा परिणाम आहे. जनता सहकार्य करते म्हणुन शोषन सुरु राहते. राज्याचा आधार जनतेची इच्छा असते. अत्याचारी राज्य जनतेच्या सहकार्यावरच चालतात अशा राज्याला सहकार्य न केल्यास ती सरळ मार्गावर येऊ शकतात. गांधीनी 1920-21 मध्ये ही असहकाराची चळवळ सुरु केली. शासितांच्या स्वीकृतीशिवाय निरंकुश सरकार देखील कायम राहु शकत नाही, निरंकुश सत्ताधारी ही स्वीकृत शक्तीने मीळवीतो, प्रजा निरंकुश शक्तीला भिवो सोडुन देते तेव्हाच निरंकुश सत्ता समाप्त होईल.

**2. सविनय कायदेभंग :-**

1930-31 च्या सुमारास म. गांधीजींनी सवीनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली. राज्यकर्ते जर जनतेकडे दुर्लक्ष करुन राज्यकारभार करत असतील तर जनतेने राज्याचे कायदे पाळु नयेत. कायदेभंग करताना समाजहिताची हाणी होणार नाही हि काळजी घ्यावी. कायदेभंग करताना हिंसा होणार नाही यांची काळजी घ्यावी. अहिंसात्मक मार्गानेच कायदेभंग करावा.

**3. हरताळ :-**

हरताळ म्हणजे सर्व दैनंदीन व्यवहार बंद करणे. उदा - शाळा, कॉलेज, बाजार, दुकाने, बस, रेल्वे, सहकारी निमसकारी कार्यालये, सिनेमा सर्व बंद ठेवणे. हरताळ ऐच्छीक असावा तो बळजबरीने नसावा. अंतर्गत विरोधामुळे सत्यागृही काम बंद करतात. हरताळ हिंसात्मक नसावा. हरताळाची भुमीका इतरांना स्पष्ट समजली पाहीजे. हरताळ करणाऱ्यांना इतर काम आले पाहीजे. कोणतीही कला त्यांना अवगत असावी, हरताळ कर्त्यांनी केवळ हरताह फडावर अवलंबुन राहु नये, नाही तर त्यांचे कमी होईल.

**4. उपोषण :-**

उपोषण हे सत्याग्रहाचे प्रभावी साधन आहे. उपोषण हे अतिशय आवश्यक असतानाच वापरावयाचे साधन आहे. ज्यांचा आत्मा पुर्ण शुध्द आहे त्याच व्यक्ती उपोषण करु शकतात. स्वतःला कष्ट होते त्यामुळे पाषाण ऱ्हदयी माणसाचे देखील परिवर्तण होऊ शकते. उपोषणाचा स्वार्थी हेतु नसावा. आमरन उपोषण करण्यास देखील गांधीजींची मान्यता होती.

**5. बहिष्कार :-**

राजकीय व सामाजीक या दोन्हीही क्षेत्रात वहिष्काराचा वापर करता येतो. जनमनाची अवहेलना करणाऱ्यांना सहकार्य न करणे म्हणजे बहिष्क़ार होय. बहिष्कारामुळे त्या व्यक्तीला आपल्या दुर्वर्तनाची जाणीव होते व ती व्यक्ती योग्य मार्गावर येते. हिंसेचा मार्ग अनुसरुन किंवा कोणच्याही दबावाखातर बहिष्काराचा कापर करु नये. ब्रिटीशांच्या राजवटीत भारतीयांनी परकीय मालावर बहिष्कार टाकला होता.

**6. हिजरत किंवा देशत्याग :-**

जेव्हा एखादया वेळी जनतेवर सतत अन्याय अत्याचार केले जातात आणि त्या अत्याचाराला अहिंसेच्या मार्गाने प्रतिकार करणे शक्य होत नसेल तेव्हा त्या व्यक्तीने किंवा जनतेने तो प्रदेश सोडावा, स्थलांतर करावे, आपल्या रक्षणासाठी जर त्यांना हिंसात्मक मार्गाचा अवलंब करावा लागत असेल तर त्यांनी ते स्थान सोडुन द्यावे. बारडोली जुनागड येथील सत्यागृहांना त्यांनी हिजरत प्रयोगाची संमती दिली होती यामध्ये सत्यागृहि किंवा अन्य व्यक्ती त्या स्थानावर राहु शकत नाही म्हणुन त्यांनी हिजरतचा प्रयोग करावा.

**7. धरणे :-**

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , महात्मा गांधी यांचे विचार | January 2019 | UGC Approved No. 40705

धरणे धरताना हिंसात्मक मार्गाचा अवलंब करु नये, तसेच दबाव, धमकी, जाळपोळ या हिंसात्मक गोष्टींचा वापर टाळावा. त्या व्यक्तीला व्यवस्थीत समजावे, सत्यगृह म्हाजे सत्याचा आग्रह धरुण आपले साध्य या वरील साधनाचा वापर करुन घेण होय. सत्यागृह हा फक्त देशामध्ये होणाऱ्या अन्यायाविरुध्द वापरला जातो असे नाही तर त्याचा वापर विदेशी आक्रमण रोकणे हे सुध्दा त्यामुळे शक्य होते.

**सत्यगृहाची वैशिष्ट्य :-**

म. गांधीर्जीनी जनतेला स्वातंत्र्य लढ्यात लढण्यासाठी सत्यग्रह हे एक प्रभावी साधन म्हणुन दिले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात म. गांधीनी मोठे योगदान दिले आहे. आज जगात सर्वसामान्य जनतेने अन्याय, हुकुमशाही, जुलुम या विरुध्द लढण्यासाठी सत्यागृह हेच साधन वापरले. गांधीर्जीची सत्यागृह हि योजना जगभर पोहचली आहे. सत्यागृह आणि गांधीचे तत्वज्ञान हे विषय अनेक परदेशि विद्यापिठात शिकवले जात आहेत. नैतीकता सत्यागृह हे साधन केवळ अन्यायाविरुध्द वापरण्याचे हत्यार असा गांधीचा विचार नाही. सत्यगृह हा नैतीकतेवर आधारीत आहे. सत्यागृहामुळे सर्व संबधीताचे कल्याण होते. अन्याय करणाराही पराभुत न होता शुध्द होतो. अन्याय ज्याच्यावर होता तो सत्यागृहामुळे मुक्त व तेजस्वी बलतो. राजकारणात सत्यागृह आणुन त्यांनी नैतीकता आणली.

**सारांश :-**

आधुनिक भारताच्या निर्मीतीस म. गांधीना एक महत्वपुर्ण स्थान आहे. आधुनिक भारताच्या इतिहासात त्यांच्या कार्याला तोड नाही, भारतातील अनेक नेत्यावर त्यांचा पंभाव पडला होता. 1920 ते 1948 हा कालखंड गांधीयुग नावाने ओळखला जातो.

**निष्कर्ष :-**

1. गांधीर्जीनी आपले विचार व्यक्त करताना क्रमबध्दता न देता परिस्थिनुरुप मांडले आहेत.
2. आपले विचार संकलीत त्यांनी कोणत्याच वादाला जन्म दिला नाही.
3. गांधीवाद म्हणुन कोणताही सिंध्दात मांडला नाही.
4. सत्य आणि अहिंसा हाच त्यांच्या जिवनाचा क्रम होता.
5. आपल्या विचारांना त्यांनी पुर्ण कधीच मानले नाही.

**संदर्भ :-**

1. डॉ. दिनकर एस.कावळे भारतीय राजकीय विचारवंत (2005), कैलास पब्लीकेशन्स औरंगाबाद
2. प्रा. बी.वाय. कुलकर्णी, संटेनेट राज्यशास्त्र विद्याभारती प्रकाशन लातुर.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 124 C : महिलांची सुरक्षितता व सशक्तीकरण अंतर्गत महिलांमध्ये करावयाची सामाजिक व कायदेविषयक जाणीव जागृती
ISSN : 2348-7143
Feb. 2019

# भारतातील महिला सुरक्षा विषयक कायदे व कायद्याची वास्तवता व उपाय

प्रा.डॉ. के.जी. पोकळे
संशोधन मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभागप्रमुख, नवगण शिक्षण संस्था राजुरीचे कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा ता.जि.बीड
प्रा.डॉ.संजय वामनराव भोळे
अप्पासाहेब र.भा.गरूड कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,शेंदुर्णी ता.जामनेर जि. जळगांव

**प्रस्तावना**

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. स्वातंत्र्यानंतर भारतात स्वातंत्र्य,समता,न्याय,बंधुता या तत्वाचा स्विकार करून भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातुन त्यांची वास्तवता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेच्या या सर्व तत्वांच्या आधारावरच लोकशाहीचा खरा डोलारा उभा आहे.

याच अनुषंगाने स्त्रि आणि पुरूष ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि या दोघांच्या समान अधिकार आणि विकासातुन देशाचा खरा विकास साधला जाऊ शकतो. या भूमीकेतुनं स्त्रि आणि पुरूष यांच्या समानतेचे तत्व संपूर्ण भारतभर रुजविण्याचा प्रयत्न भारतीय राज्यघटनेबरोबरच भारतीय शासन आणि प्रशासन तसेच महीला चळवळी यांनी केलेला आहे. त्याला प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आज आपल्या भारतात आणि भारतातील विविध घटकराज्यात विविध कायदे करण्यात आलेले आहेत. स्त्रियांना या कायदद्याची जाणीव व्हावी यासाठी सुध्दा शासन, प्रशासन आणि सामाजिक पातळीवर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत.

असे आसले तरी भारतात आणि प्रामुख्याने पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात स्त्रियांवर बऱ्याच प्रमाणात अन्याय अत्याचार होतांना आपणास दिसत आहेत. आजही स्त्रियांना कौटुबिक छळ,लैंगिक अत्याचार,स्त्रि-पुरूष विषमता याला मोठ्या प्रमाणावर सामोरे जावे लागत असतांनाचे चित्र आपणास दिसत आहे. याचा गांभीर्याने विचार करणे व त्यावर योग्य अशी उपाय योजना करणे आज काळाची गरज झाली आहे. अन्यथा ही स्त्रि-पुरूष विषमतेची दरी अशीच वाढत जाऊन भारताची अर्धशक्ती समजली जाणारी स्त्रि शक्ती ही भारताच्या महासत्तेसाठी धोकादायक ठरेत. याच अनुषंगाने प्रस्तूत शोध निबंधात महिला सुरक्षा विषयक कायदे व त्याची आज असणारी वास्तवता याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दीष्टे**

१) भारतातील व महाराष्ट्रातील स्त्रियांसाठी असणाऱ्या कायद्यांचा आढावा घेणे.
२) स्वातंत्र्यानंतर भारतात स्त्रि-पुरूष समतेसाठी कायद्याच्या आधारे केले जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.
३) स्त्रीयांच्या अधिकाराबाबत त्यांना असलेली जाणीव जागृती याचा आढावा घेणे.
४) महिला विषयक कायदे व त्यांची वास्तवता याचा आढावा घेणे.
५) महिला विषयक कायदे व त्याची आजची प्रासंगिकता याचा योग्य आढावा घेणे.
६) महिलांसाठी असलेल्या कायद्याच्या आधारातुन समाजात होणारे परिवर्तन स्पष्ट करणे.

**महिला कल्याणासाठी कायदे**

भारतात विशेषतः स्वातंत्र्यानंतर महिलांच्या विकासाठी व त्यांच्यावरील होणाऱ्या अन्याय अत्याचाराला थांबविण्यासाठी भारतात व महाराष्ट्रात अनेक कायदे झालेली आपणास दिसतात, परंतु त्याची वास्तविकता मात्र फार वेगळी असल्याची आपणास दिसुन येते.

१) **हुंडा प्रतिबंधक कायदा** – १९६१ च्या या कायद्यानुसार हुंडा मागणे आणि हुंडा घेणे हे गुन्हा आहे आणि हा कायदा अधिक प्रभावी होण्यासाठी भारतीय दंड संहितेमध्ये ३०४(ख) आणि ४९८(क) ही नवीन कलमे सुध्दा अंतर्भुत आहेत. असे असले तरी भारतीय समाज व्यवस्था आजही या कायद्यांना फारसे महत्व देतांना दिसत नाही. आज अनेक सुशिक्षित व ज्ञानसंपन्न कुटूंबामध्ये महिलांचा हुंडासाठी छळ केला जातो ही वास्तव परिस्थीती आहे.

२) **महिला संरक्षण कायदा** – कौटुंबीक छळ प्रतिबंधक कायदा हा स्त्रियांना कौटुंबीक, सामाजिक, आर्थिक व शारीरीक संरक्षण देतो. हा कायदा फक्त पुरूषाविरूध्दच लागू होतो. यात अंतरिम आदेश देणे, नुकसान भरपाई देणे, संरक्षण अधिकाऱ्याची नियुक्ती करणे. भागीदारीच्या घरात राहण्याचा अधिकार व कायदेशिर व वैद्यकीय मदत देण्याची तरतुद आहे.

३) **अश्लिलता विरोधी कायदा** – भारतीय दंड संहितेच्या कलम २९२ ते २९४ मध्ये महिलांशी अश्लिल वर्तन करणाऱ्यांना शिक्षा देण्याची तरतुद आहे. त्याचप्रमाणे जाहिराती चित्र,पुस्तके इ. माध्यमातून महिलांची विटबंना करणाऱ्या चित्र किंवा लेखणातून अश्लिलता सादर करणाऱ्या विरोधी कायदा १९८७ नुसार वॉरंट शिवाय अटक करण्याचा अधिकारही आहे. परंतु आज सर्रास अशा कायद्यांचे उलंघन ब-याच प्रमाणात होतांना दिसते.

४) **बालविवाह प्रतिबंधक कायदा** – बालविवाहाची प्रथा बंद करण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिनियम(शारदा ॲक्ट) १९८७ मध्ये सुधारण करण्यात आलेल्या आहेत. लग्नाच्या वेळी मुलीचे वय किमान १८ व मुलाचे वय २१ वर्षाहुन कमी असल्यास शिक्षेची तरतुद आहे. हा कायदा सर्वच जाती-धर्मासाठी सारखाच आहे. परंतु आज भारतातील राजस्थान,मध्यप्रदेश,महाराष्ट्र यासारख्या बऱ्याच राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात बालविवाहास चालना दिली जाते. ही वास्तवता आहे.

५) **कौटुंबिक न्यायालय कायदा** – कौटुंबीक अधिनियम १९८४ नुसार दाम्पत्य व कौटुंबीक कलहाची प्रकरणे एकाच ठिकाणी सोडविण्यासाठी कुटुंब न्यायालय नसल्यास तिथल्या जिल्हा कोर्टांना कुटूंब न्यायालयाचा दर्जा देण्यात आला आहे.

६) **छेडछाड करणे गुन्हा** – महिलांची अब्रु लुटने, हातधरणे,तिच्या वस्त्रांना हात घालणे अशा प्रकारे महीलांचा नियभंग करणाऱ्यांना भारतीय दंड संहिता ३५४ खाली शिक्षेची तरतुद आहे.

७) **मुलावर हक्क** – एखाद्या स्त्रीचा घटस्फोट झाल्यास तिच्या पाच वर्षापर्यंतच्या मुलांना ती स्वतःजवळ ठेवु शकते, मात्र पाच वर्षाहुन अधिक वयाच्या मुलांच्या बाबतीत कोर्टाचा निर्णय बांधील असतो.

८) **समान वेतन कायदा** – समान वेतन कायद्यानुसार एकाच कामासाठी स्त्री व पुरूष या दोघांना समान वेतन मिळाले पाहिजे. विशीष्ट कार्यक्षेत्र सोडुन अन्य ठिकाणी स्त्रीयांना रात्रपाळीला कामाला बोलावता येत नाही.

९) **लैंगिक गुन्हे** – लैंगीक गन्ह्यासंबधात भारतीय दंडसंहीता कलम ३७५ व ३७३ अनुसार कडक शिक्षा देण्यात येतात. लैंगिक प्रकरणाची सुनावणी कार्टाच्या बंद खोलीत होते.

१०) **हिंदु उत्तराधिकार** – १९५६ मध्ये निर्माण झालेल्या हिंदु उत्तराधिकार कायद्यानुसार महिलांना संपत्तीमध्ये व्यापक अधिकार देण्यात आले असून स्त्रीधनाचा उपभोग घेण्याचा व ते धन खर्च करण्याचा अनिबंध अधिकार स्त्रिला मिळाला आहे. स्त्रीला तीचे धन मिळावे म्हणून कोर्टात खटला दाखल करता येतो. तसेच मुलाप्रमाणेच वडीलांच्या संपत्तीमध्ये हक्क मागता येतो.

११) **हिंदु विवाह कायदा** – भारतीय दंडसंहिता कलम १२५ अनुसार स्त्रीला पोटगीची मागणी करण्याचा हक्क आहे. हिंदु विवाह कायदा १९५५ कलम २५ नुसार अर्ज दाखल केल्यानंतर कोर्ट पोटगीची रक्कम देण्याचे आदेश देते. पती पत्नीच्या वादामध्ये निकाल लागेपर्यंतच्या मधल्या काळात सुध्दा पत्नीच्या उदरनिर्वाहासाठी अंतरिम पोटगी देण्याची तरतुद कायद्यात आहे.

१२) **प्रसूती सुविधा कायदा** – नोकरी व्यवसायातील महिलांसाठी बाळंतपणाची आणि नवजात बाळाची देखभाल करण्यासाठी रजेची तरतुद असून त्या काळात स्त्रिला विशीष्ट दिवसाची भरपगारी रजा मिळते. मात्र कायद्यानुसार ही रजा व फायदे फक्त दोन बाळंतपणासाठी असतात. गर्भपात झाल्यावरही स्त्रीला भरपगारी रजा मिळण्याची तरतुद कायद्यात आहे.

१३) **विशेष विवाह अधिनियम** – या कायद्याच्या १९५४ च्या तरतुदी नुसार मानसिक दृष्ट्या सक्षम आणि आठरा वर्ष पूर्ण झालेली स्त्रि प्रेमविवाह किंवा अंतरजातीय विंवाह स्वत:च्या इच्छेनुसार करू शकते. या विवाहाची नोंदणी करणे आवश्यक असून पुरूषाचे वय २१ वर्षापेक्षा अधिक असावे लागते.

१४) **गर्भलिंग चाचणी** – स्त्री भृण हत्या रोखणे व गर्भाचे लिंग जाणून घेण्याच्या तंत्राचा दुरूपयोग करणे यावर अंकुश ठेवण्यासाठी प्रस्तुतिपूर्व निदान आणि तंत्रज्ञान विनियम व दुरूपयोग निवारण अधिनियम १९९४ आहे.

१५) **जिल्हा महिला सहाय्यता समिती** – महिलांचे शोषण व छळ होऊ नये म्हणून हायकोर्टाच्या आदेशानुसार प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महिला साहयता समिती स्थापन करण्यात आली आहे.

१६) **लैंगीक छळाविरूध्द मार्गदर्शन तत्व** – नौकरीच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ थांबविण्यासाठी सुप्रीम कोर्टाने मार्गदर्शक तत्वे लागु केली आहेत. खाजगी,सार्वजनिक तसेच अन्य संस्थामध्ये सुध्दा महीलांवर होणाऱ्या छळाच्या निवारणासाठी प्रत्यक विभागात महिला अध्यक्षासह अर्ध्यापेक्षा अधिक महिला असणरी समिती स्थापन करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

१७) **महिलांना अटक संबधी नियम** – महिलांना फक्त पोलीस सुर्योदयानंतर आणि सुर्यास्तापूर्वी अटक करू शकतात तसेच महीलांना अटक केल्यानंतर त्यांना स्वतंत्र महिला कक्षेतच ठेवता येते.

१८) **महिला आयोग** – महिलांना संवैधानिक व न्यायीक सुरक्षा आणि अधिकार देण्यासाठी ३१ जानेवारी १९९२ रोजी महिला आयोगाची स्थापना झाली आहे. प्रत्येक राज्यातही महीला आयोग आहे. यानुसार महिला कोणतीही तक्रार थेट महिला आयोगाकडे करू शकतात.

**महिला विषयक कायद्यांची वास्तवता**

वरीलप्रमाणे महिलांच्या हक्क व अधिकाराच्या रक्षणासाठी आज पर्यंत अनेक कायदे झालेले आपणास दिसून येतात असे असले तरी आज मात्र याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत असलेली वास्तवता विरोधाभासाची दिसून येते.

जगातील एकूण बालविवाहापैकी ४०टक्के बाल विवाह एकट्या भारतामध्ये होतात. महिला अत्याचारा बाबतीत महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्र राज्यात महिला वरील अत्याचाराच्या रोज साधारणत: २० घटना घडतात. मागील १५ वर्षापासुन महिलांच्या अत्याचाराच्या प्रमाणात असंख्य गुणे दाखल झाले आहेत. महाराष्ट्र राज्यातील सर्व कोर्टामध्से २०१० साली महिला अत्याचाराचे १,२१,६१० गुन्हे निकालाच्या प्रतिक्षेत होते. या खटल्यातील ८,८५६ आरोपींची निर्दोष मुक्तता झाली.

महिला अत्याचाराचे सर्वाधीक गुन्हे आंध्रप्रदेशात दाखल असुन त्या पाठोपाठ बंगाल, उत्तरप्रदेशचा क्रमांक लागतो या मध्ये महाराष्ट्र १८ व्या क्रमांकावर आहे. बिहार मध्ये सर्वाधीक हुंडाबळीच्या घटना घडतात तर हरीयाणात सगळ्यात जास्त सामुहीक बलात्काराच्या घटना घडतात.
हुंडाप्रतिबंधक कायदा असतांना सुध्दा आज हुंड्यासाठी महिलांचा छळ केला जात आहे. महिला संरक्षण कायदे असतांना सुध्दा महिलांना त्यांचे स्वातंत्र्य उपभोगता येत नाहीत.

बलात्काराच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होउन समाजात भयभीततेचे वातावरण निर्माण झाले आहे.. उदा – दिल्लीतील निर्भयावरील बलात्कार,महाराष्ट्रातील कोपर्डी गावातील छकुली या विद्यार्थीनीवर झालेला बलात्कार संपूर्ण देश हादरून टाकणारी घटना आहे.

बालविवाहाचे प्रमाण कायदे करूनही वाढतच आहे. महिलांच्या छेडछाडीचे प्रमाण ही आज वाढतांना दिसत आहे.

स्त्रि–पुरूष भेद हा निसर्गानेच निर्माण केला आहे अशी समाजाची खोटी धारणा झाली आहे. त्यातुन सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणीक पातळीवर महिलांना दुय्यम वागणूक दीली जात असल्याचे अनेक उदाहरणे आहेत.

मंदीरात प्रवेश नाही, राजकारणात वास्तव हक्क नाही, शिक्षणात समाज दर्जा नाही, वाढती भ्रूण हत्या या सारख्या भयावह अशा प्रश्नांनी महिला पोखरलेल्या आहेत. याची जाणीव महिलांना आता खऱ्या अर्थाने होणे व अशा अन्यायाविरूध्द महिलांनी पेटुन उठणे गरजेचे आहे. कारण केवळ कायद्याने परिवर्तने होणे शक्य नाही.

**उपाय**

१) स्त्रि–पुरूष भेद सामाजिक पातळीवरून नष्ट करणे गरजेचे आहे.

२) स्त्रियांनी आपली नकारात्मक मानसिकता बदलने गरजेचे आहे.

३) कायद्याबरोबरच त्यांची अंमलबजावणी ह्या दोन्ही बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत. या बाबत शासन व प्रशासनाने कठोर पावले उचलली पाहीजेत.

४) महिलांवरील अत्याचारासह आळा घालण्यासाठी अत्याचार करणाऱ्यास त्वरीत शिक्षा झाली पाहीजे.
५) गुन्ह्यासाठी माफी नसावी.
६) महिलांमध्ये सतत त्यांच्या अधिकाराबाबत जागृती निर्माण करणे शासन, प्रशासन व समाजातील समाजसेवी संस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.
७) महिलांनीच महिलांचे रक्षण केले पाहिजे.

**निष्कर्ष**

एकंदरीतच भारताच्या महासत्तेची स्वप्ने व बघत असतांना भारत हा देश केवळ भौतिक साधनांच्या वृध्दीतून महासत्ता होईल याचा विचार करून चालणार नाही तर भारतात असणारी मानवसंसाधन संपती व त्यामध्ये असलेली स्त्रि–शक्ती यांच्या ही अधिकाराचे रक्षण करून त्यांचा देशाच्या विकासात हात भारत लावणे हे सुध्दा तितकेच गरजेचे आहे.

असे झाले तर प्राचीन काळापासुन महिलांकडे बघण्याचा भोगवादी दृष्टीकोण नष्ट होउन महिलांना सुध्दा चूल आणि मुल या पलीकडे जाऊन आपले खरे स्वच्छंदी जीवन जगता येईल अणि मग खऱ्या अर्थाने भारतात कायद्याचे राज्य येईल व स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर होईल असे म्हणता येईल.

**संदर्भ**

१. भारताचे संविधान, भारतसरकार, व विधीन्यायमंत्रालय २०११
२. डॉ. प्रमोद पवार(संपादक) महाराष्ट्रातील स्थित्यंतरे, अर्थव पब्लिकेशन जळगांव, ११ जानेवारी २०१९
३. डॉ. रेखा वानखेडे (संपादक) Decision and action research journal Decembar 2011
४. डॉ. पंडीत नलावडे (संपादक) 21th centure Word : Present scenario and Challenges प्रथमेश प्रकाशन अहमदनगर फेब्रुवारी २०१६
5. https//m.dailyhunt.in>marathi8oct2018
5. BBC News/ Marathi 24 April 2018
6. Maharashtra Times.indiatiomes.com 2 Dec.2017
7. Maharashtra Times(cid Report) 16 Dec 2011
8. Vikaspedia.in,Maharashtra times 8 March 2009
९. दै.लोकमत, ३ फेब्रुवारी २०१९, पृष्ठ क्र.८
१०. दै.लोकमत, राज्य आवृत्ती २८ जानेवारी २०१९, पृष्ठ ६
११. दै.लोकमत, २ फेब्रुवारी २०१९, पृष्ठ ३
१२. दै. लोकमत ४ फेब्रुवारी २०१९ पृष्ठ २